# मेसर्स. मिनाक्षी ॲग्रो इंडस्ट्रीज एलएलपी या उद्योगाकडून विद्यमान धान्य आधारित मद्य निर्मिती कारखान्याचा उत्पादन क्षमतेचा विस्तार ४० किलो लिटर प्रतिदिन पासून विस्तारीकरण २०३ किलो लिटर प्रतिदिन १२ किलो लिटर प्रतिदिन माल्ट स्पिरिट आणि ७.० मेगावॅट कॅप्टिव्ह पॉवर प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीचे इतिवृत्त

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांची पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनीयम दि.१४.०९.२००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार, मेसर्स. मिनाक्षी ॲग्रो इंडस्ट्रीज एलएलपी या उद्योगाकडून विद्यमान धान्य आधारित मद्य निर्मिती कारखान्याचा उत्पादन क्षमतेचा विस्तार ४० किलो लिटर प्रतिदिन (४० Kl X ३६५ दिवस = १४,६०० किलो लिटर प्रतिवर्ष) पासून २०३ किलो लिटर प्रतिदिन (२०३ Kl X ३६५ दिवस क्षमता ७४,०९५ किलो लिटर प्रतिवर्ष) पर्यंत वाढवण्याचा मानस असून या व्यतीरीक्त १२ किलो लिटर प्रतिदिन (१२ Kl X ३६५ दिवस = ४,३८० किलो लिटर प्रतिवर्ष) माल्ट स्पिरिट आणि ७.० मेगावॅट कॅप्टिव्ह पॉवर यंत्रणा उभारणी प्रस्तावीत आहे. सदर विस्तारी करण प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीकरिता अर्ज उद्योगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर केला आहे. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दि. **२५/०५/२०२६** रोजी सकाळी ११:३० निश्चित करण्यात आली. तसेच सदरच्या लोकसुनावणीसाठीचे आदेश मा. सदस्य सचिव, मप्रनि मंडळ यांचे दि. **०८/०५/२०२६** रोजीच्या पत्रान्वये देण्यात आले.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे कार्यालयीन आदेश दि. **०८/०५/२०२६** अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

१. श्रीमती. निलम बाफना : - अध्यक्ष
उपविभागीय अधिकारी
उपविभागीय कार्यालय पैठण

२. श्री. मनिष होळकर : - सदस्य
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ,
छत्रपती संभाजीनगर.

३. श्री.अच्युत नांदवटे : - समन्वयक
उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ,
छत्रपती संभाजीनगर.

श्री. अच्युत शे. नांदवटे समन्वयक पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, छत्रपती संभाजी नगर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांची पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनीयम दि.१४.०९.२००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार, मेसर्स. मिनाक्षी ॲग्रो इंडस्ट्रीज एलएलपी या उद्योगाकडून विद्यमान धान्य आधारित मद्य निर्मिती कारखान्याचा उत्पादन क्षमतेचा विस्तार ४० किलो लिटर प्रतिदिन (४० Kl X ३६५ दिवस = १४,६०० किलो लिटर प्रतिवर्ष) पासून २०३ किलो लिटर प्रतिदिन (२०३ Kl X ३६५ दिवस क्षमता ७४,०९५ किलो लिटर प्रतिवर्ष) पर्यंत वाढवण्याचा मानस असून या व्यतीरीक्त १२ किलो लिटर प्रतिदिन (१२ Kl X ३६५ दिवस = ४,३८० किलो लिटर प्रतिवर्ष) माल्ट स्पिरिट आणि ७.० मेगावॅट कॅप्टिव्ह पॉवर यंत्रणा उभारणी प्रस्तावीत आहे. सदर विस्तारी करण प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीकरिता अर्ज उद्योगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सादर केला आहे. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दि. **२५/०५/२०२६** रोजी सकाळी ११:३० निश्चित करण्यात आली. तसेच सदरच्या लोकसुनावणीसाठीचे आदेश मा. सदस्य सचिव, मप्रनि मंडळ यांचे दि. ०८/०५/२०२६ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आले. **सोबत सहपत्र १.**

सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार जाहीर सूचना ३० दिवस अगोदर दि. २४/०४/२०२६ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली. **सोबत सहपत्र २** सदर प्रकल्पाची माहिती पुस्तिका, कार्यकारी सारांशाची प्रत, पर्यावरण आघात मुल्याकंन अहवालाच्या प्रती इत्यादी दस्तावेज (इंग्रजी व मराठी मध्ये) जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालयांमध्ये नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता खालीलप्रमाणे ठेवण्यात आलेल्या होत्या व याबाबत काही सूचना / आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मुदत देण्यात आलेली होती. **सोबत सहपत्र ३**

१. जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
२. जिल्हा परिषद कार्यालय, अंबा अप्सरा समोर, छत्रपती संभाजीनगर.
३. जिल्हा उद्योग केंद्र, छत्रपती संभाजीनगर.
४. तहसिल कार्यालय, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर.
५. पंचायत समिती कार्यालय, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर.
६. प्रादेशिक कार्यालय,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर.
७. शाखा अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर
८. प्रादेशिक कार्यालय/उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. ४/१ पर्यावरण भवन लोकपत्रच्या मागे, चिकलठाणा, औद्योगिक क्षेत्र, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर.

९. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.

१०. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.

११. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

जन सुनावणी बाबत वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या जाहीर सूचनेमध्ये प्रकल्पासंबंधीत बाधित अथवा इतर व्यक्तींनी प्रकल्पाचा पर्यावरण आघात मूल्यांकन अहवाल, कार्यकारी सारांशाच्या प्रति अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकल्पाबाबत आपले मत, विचार, सूचना, हरकती लेखी स्वरूपात सुनावणीच्या दिवसापर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना कळविण्यात याव्यात अथवा सुनावणीच्या दिवशी देण्यात याव्यात. सुनावणी दरम्यान आपले लेखी मत, विचार, सूचना, हरकती सादर केल्या जाऊ शकतात अथवा त्यांचे सादरीकरण केले जाऊ शकते याबाबत आवाहन करण्यात आले. त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने उप-प्रादेशिक कार्यालय, सदर सुनावणीच्या दिवसापर्यंत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे ३ निवेदन प्राप्त झाले आहेत. **सोबत सहपत्र ४**. त्यांनी सांगितले की पर्यावरण विषयक जन सुनावणी ही सर्वसामान्य लोकांसाठी त्यांचे मत व्यक्त करण्याचे ठिकाण असून पर्यावरण विषयक अनुज्ञप्ती संमत करण्याबाबत निर्णय केंद्रीय वने, पर्यावरण व वातावरणीय मंत्रालय, नवी दिल्ली येथे घेतला जाईल. त्यामुळे त्यांनी उपस्थित जनसमुदायास सदर प्रकल्प बाबतचे त्यांचे मत, आक्षेप, हरकती, सूचना व्यक्त करण्याबाबतचे आवाहन केले. आपण व्यक्त केलेले मत सूचना आक्षेप यांचे व्हिडिओ शूटिंग करून त्याबाबतचे इतिवृत्त पर्यावरण विभाग मंत्रालय यांना सादर केले जाईल असे त्यांनी सांगितले.

जनसुनावणी समितीच्या अध्यक्षा तथा उपविभागीय अधिकारी श्रीमती बाफना यांनी पर्यावरण विषयक जन सुनावणी सुरू करण्याचे व प्रकल्प प्रवर्तकास त्यांच्या प्रकल्पाचे पर्यावरण विषयक ठळक बाबी पर्यावरण विषयक केलेल्या उपायोजना इत्यादी बाबत सादरीकरण करतील असे सांगितले. त्यानंतर प्रकल्प प्रवर्तकाचे पर्यावरण सल्लागार अॅनाकॉन लॅब नागपूर, यांनी प्रकल्पाचे सादरीकरण केले. त्यांच्या सादरीकरण त्यांनी प्रकल्पाची सद्यस्थिती, पर्यावरण विषयक सद्यस्थिती, प्रस्तावित प्रदूषण नियंत्रण यंत्रणा, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व त्याचे निराकरण करावायाच्या पद्धती इत्यादी बाबतची माहिती दिली. सादरीकरणाची प्रत सोबत जोडली आहे. त्यानंतर त्यांनी त्यांचे सादरीकरण संपले असे जाहीर करून उपस्थित जनसमुदायास त्यांचे प्रश्न, शंका अथवा सूचना देऊ शकतात असे सांगितले. प्रकल्प प्रवर्तकाचे प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर जन सुनावणीचे आयोजक श्री. नांदवटे यांनी उपस्थित जनसमुदायास उद्देशून आपले काही प्रश्न शंका सूचना असल्यास त्याबाबतचे लेखी निवेदन देण्यात यावे अथवा लेखी निवेदन देऊन आपले म्हणणे मांडू शकता असे सांगितले.

१. **श्री. प्रकाश लबडे माजी उपसरपंच मुदलवाडी स्थानिक रहिवासी यांनी खालील प्रमाणे सांगीतले आहेत-**

पैठण औद्योगिक क्षेत्रासाठी झालेल्या भूसंपादनापैकी ७० टक्के जमीन मुदलवाडी या गावाची असून स्थानिक ग्रामस्थांना फक्त ३० टक्के जमीन शिल्लक असून त्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. ग्रामस्थांनी उद्योगांसाठी जमिनी दिल्यानंतर भूमिपुत्रांना सदर उद्योगांमध्ये त्यांच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे प्राधान्य देणे गरजेचे होते परंतु सद्यस्थितीत काम करणारा बहुतांश कामगार वर्ग कंत्राटी स्वरूपाचा असून स्थानिक भूमिपुत्रांच्या प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. आपला प्रकल्प खूप चांगल्या पद्धतीने दाखविलेला असून प्रकल्पामध्ये स्थानिक कामगारांना कायमस्वरूपी समावेश करून घेणे, हरित पट्टा विकसित करणे, सांडपाणी प्रदूषण व हवा प्रदूषण बाबत काळजी घेऊन प्रकल्प चालवण्यास माझी हरकत नाही असे त्यांनी सांगितले.

**प्रकल्प प्रवर्तक-** सदर प्रकल्प धान्य आधारित मध्य निर्मिती प्रकल्पातून कमीत कमी रसायनांचा वापर केला जाणार आहे. उद्योगातून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रियेसाठी अद्यावत सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा, इ एस पी प्रणालीवर आधारित हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा करण्यात येईल. हरित पट्टा विकासाबाबत प्रचलित शासकीय नियमावली, केंद्रीय शासकीय यंत्रणाकडून प्राप्त झालेला टी ओ आर यांच्या आधारे करण्यात येईल. सदर प्रकल्पास परवानगी केंद्रीय स्तरावरून पर्यावरण विभाग व राज्य स्तरावरून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याकडून प्राप्त केली जाईल व परवानगी मध्ये नमूद अटीनुसार सर्व तरतुदी करण्यात येतील. सद्यस्थितीत आम्ही हरित पट्टा ४९.२७ टक्के करण्याचे प्रस्तावित आहे. प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार डॉ. गार्वे यांनी सांगितले की उद्योगाने बॉयलरसाठी ५ स्टेज असलेला इ एस पी प्रस्तावित केलेला असून त्यामध्ये अविरत हवा गुणवत्ता तपासणी यंत्रणा बसविलेली आहे. बॉयलर मधून बाहेर पडणाऱ्या हवेची गुणवत्ता केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संकेतस्थळावर अविरतपणे दाखवली जाईल. उद्योगातून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रियेसाठी अद्यावत शून्य निकसन सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविलेले असून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पूर्णपणे पुनर्वापर केला जाईल.

२. **विष्णू आसाराम बोडके, राहणार मुदलवाडी तालुका पैठण जिल्हा छत्रपती संभाजी नगर-**

पैठण औद्योगिक क्षेत्रासाठी झालेल्या भूसंपादनापैकी ७० टक्के जमीन मुद्दल वाडी या गावाची असून स्थानिक ग्रामस्थांना फक्त ३० टक्के जमीन शिल्लक असून त्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. ग्रामस्थांनी उद्योगांसाठी जमिनी दिल्यानंतर भूमिपुत्रांना सदर उद्योगांमध्ये त्यांच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे प्राधान्य देणे गरजेचे होते परंतु सद्यस्थितीत काम करणारा बहुतांश कामगार वर्ग कंत्राटी स्वरूपाचा असून स्थानिक भूमिपुत्रांच्या प्रमाण नगण्य असल्याचे त्यांनी सांगितले आपला प्रकल्प खूप चांगल्या पद्धतीने दाखविलेला असून प्रकल्पामध्ये स्थानिक कामगारांना कायमस्वरूपी समावेश करून घेणे, हरित पट्टा विकसित करणे, सांडपाणी प्रदूषण व हवा प्रदूषण बाबत काळजी घेऊन प्रकल्प चालवण्यास माझी हरकत नाही असे त्यांनी सांगितले. उद्योगाने सादरीकरणात दाखवलेला प्रकल्प खूप चांगला असून कंपनी उभारणी संदर्भात त्यांनी स्थानिकांना प्राधान्य दिल्याचे दिसून येते त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

एमआयडीसी पैठण परिसरात आलेल्या उद्योगामुळे व सांडपाणी प्रदूषणामुळे औद्योगिक क्षेत्रालगतच्या जमिनीतील पाण्याची गुणवत्ता खालावली असून पाण्याचा रंग पिवळा झालेला आहे व सर्व पाणी पिण्यास अथवा शेतीसाठी योग्य राहिलेले नाही. सदर बाबी माननीय उपजिल्हाधिकारी मॅडम, प्रादेशिक अधिकारी व उप-प्रादेशिक अधिकारी यांना माहीत असून परिसरात झालेल्या प्रदूषणामुळे शेतकऱ्यांवर आत्महत्येची वेळ आलेली आहे.शेतजमिनीच्या मातीमध्ये रसायन युक्त पाणी मिसळल्यामुळे मातीचा पोत खराब झालेला असून मातीची उत्पादन क्षमता कमी झालेली आहे. त्यामुळे मुदलवाडी, वाहेगाव, पिंपळगाव या सभोवतालच्या परिसरातील जमिनी नापीक झालेल्या आहेत. जमिनीच्या नापीकीमुळे दोन शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेले असून सदर भागातील प्रदूषण शेतकऱ्यांचे नुकसान व पाण्याची गुणवत्ता खालावणे इत्यादी बाबतची केस राष्ट्रीय हरित लवाद, पुणे येथे सुरू आहे.

औद्योगिक वसाहतीतील प्रकल्पामध्ये स्थानिक कामगारांना कायमस्वरूपी समावेश करून घेण्याबाबत कायदे अस्तित्वात आहेत. उद्योगांमध्ये कामाची वेळ आठ तास असणं गरजेचे आहे परंतु पैठणमध्ये वसाहतीत कामगारांकडून सर्रास बारा तास काम करून घेतले जाते. त्यामुळे कामगार विषयक कायदेशीर अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. उद्योगातून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रियेसाठी अद्यावत शून्य निकसन सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा फक्त कागदावर दाखविली जात असून प्रत्यक्षात ती चालवली जात नाही. त्यामुळे सदर परिसरात सांडपाण्याचे प्रदूषण होत असल्याचे त्यांनी सांगितले. एमआयडीसी पैठण परिसरात आलेल्या उद्योगामुळे व होणाऱ्या वायू प्रदूषणामुळे लोकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असून स्थानिक रहिवाशांना दमा व तत्सम प्रकारचे फुफुसाचे रोग होत आहेत. पैठण औद्योगिक वसाहती सभोवतालच्या परिसरात भूगर्भातील पाण्याची गुणवत्ता पिण्यास योग्य नसून त्यामुळे नागरिक गुरेढोरे यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

अजंता फार्मा या कंपनीमध्ये नोकर भरती झालेली असून त्या ठिकाणी स्थानिक युवकांना जाणून-बुजून डावलण्यात आले आहे . पैठण औद्योगिक वसाहतीत कायमस्वरूपी कामगार ४७६ असून कंत्राटी कामगार १०५०० आहेत त्यामुळे उद्योग स्थापन झाल्यानंतर कामगार भरती प्रक्रियेत स्थानिकांना गुणवत्तेनुसार प्राधान्य देणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले. पैठण औद्योगिक वसाहतीतील १०००० कामगार स्थानिक असल्यास प्रत्येकाचा साधारण रुपये ४०००० पगार गृहीत धरल्यास पैठण औद्योगिक वसाहतीत साधारण ४० कोटी खेळतो भांडवल उपलब्ध होऊन पैठण तालुक्याचा विकास होईल. शासनाने पैठण औद्योगिक वसाहतीसाठी आमच्या जमिनी संपादित केल्या असून पैठण औद्योगिक वसाहतीतील उद्योगामुळे निर्माण होणाऱ्या नोकऱ्यांवर आमच्या मुलांचा आणि भूमिपुत्रांचा अधिकार आहे. त्याबाबत शासन स्तरावरून योग्य ती काळजी घेणे गरजेचे आहे. त्यामुळे शासनाच्या जिल्हाधिकारी कार्यालय कामगार विभाग प्रदूषण नियंत्रण मंडळ औद्योगिक सुरक्षा इत्यादी विभागांनी कोणती कामे करावीत याबाबत सर्वसामान्य जनतेला अवगत करावे अशी त्यांनी मागणी केली. पैठण औद्योगिक वसाहतीतील उद्योगामुळे सभोवतालच्या परिसरात प्रदूषण होणार नाही याबाबतची हमी माननीय जिल्हाधिकारी कार्यालय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

यांच्याकडून घेतली जावी. उद्योगाने सादरीकरणात दाखवलेल्या पद्धतीने प्रकल्प चालवल्यास पर्यावरणाचा प्रश्न निर्माण होणार नाही स्थानिकांना रोजगार मिळेल त्यामुळे सदर प्रकल्पास माझा विरोध नाही असे त्यांनी सांगितले.

**उप-प्रादेशिक अधिकारी श्री. नांदवटे** - पैठण औद्योगिक वसाहतीतील पाणी प्रदूषण व शेत पिकाचे नुकसान याबाबत माननीय राष्ट्रीय हरित लवादात याचिका क्रमांक २२२/ २०२३ मंगल विष्णू बोडके विरुद्ध मॅट्रिक्स लाइफ सायन्स व इतर ही याचिका प्रलंबित असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. माननीय राष्ट्रीय हरित लवाद यांनी सदर प्रकरणी आयसीटी मुंबई या तज्ञ संस्थेची नेमणूक केलेली असून पैठण औद्योगिक वसाहतीतील उद्योगांचे सर्वेक्षण, सांडपाणी गुणवत्ता तपासणे, शेत पिकाचे झालेले नुकसान व भूगर्भातील पाण्याची गुणवत्ता पूर्ववत करण्याबाबत आयसीटी संस्थेचा अभ्यास गट नियुक्त केला असून त्यांनी केलेल्या शिफारशी व माननीय राष्ट्रीय हरित लवाद यांच्या आदेशानुसार काम करण्यात येत आहे. सदर कामी आयसीटी मुंबई या संस्थेचा अहवाल पुढील सहा महिन्यात अपेक्षित असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याकारणाने त्याबाबत जास्तीचे बोलणे उचित नसल्याचे उप-प्रादेशिक अधिकारी श्री. नांदवटे यांनी सांगितले.

३. **श्री. दिनेश पारिक पैठण**- पैठण औद्योगिक वसाहतीत प्रदूषणाचे प्रमाण खूप वाढले असल्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जबाबदार अधिकाऱ्यांना सदर सुनावणीत बोलाविणे गरजेचे आहे. सदर प्रकल्पाला परवानगी देतेवेळी पाणी प्रस्तावित केलेल्या यंत्रणा, उभारणी करतेवेळी प्रत्यक्षात केलेली कृती याबाबतचा जिल्हा प्रशासनातील सर्व संबंधित व जबाबदार अधिकाऱ्यांनी दर दोन महिन्याला आढावा घ्यावा. सदर बैठकीत एमआयडीसी सभोवतालच्या आठ गावातील लोकप्रतिनिधींना विश्वासात घेण्यात यावे. निर्माण होणाऱ्या वेस्टेज मटेरियल च्या विल्हेवाटी बाबत योग्य ती काळजी घेण्यात यावी. ज्ञानेश्वर उद्यान प्रकल्पग्रस्त, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने जमिनी संपादित केल्यामुळे तयार झालेले प्रकल्पग्रस्त यांना उद्योगांमध्ये कायमस्वरूपी नोकरी देण्याबाबत कार्यवाही करावी. प्रदूषण नियंत्रण मंडळ व संबंधित विभागांनी कंपनी उभारणी दरम्यान व कार्यान्वित केल्यानंतर निर्माण होणाऱ्या प्रदूषणाचा फटका पैठण तालुक्यास बसणार नाही याबाबत नियमितपणे भेट देऊन पाहणी करावे व काळजी घ्यावी असे त्यांनी शेवटी सांगितले.

४. **प्रियांका विक्रम भुजंग पंचायत समिती सदस्य चितेगाव-** आपला प्रकल्प खूप चांगल्या पद्धतीने दाखविलेला असून प्रकल्पामध्ये स्थानिक कामगारांना कायमस्वरूपी समावेश करून घेणे, हरीत पट्टा विकसित करणे, सांडपाणी प्रदूषण व हवा प्रदूषण बाबत काळजी घेऊन प्रकल्प चालवण्यास माझी हरकत नाही असे त्यांनी सांगितले. उद्योगांमध्ये भूमिपुत्रांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. कंपनीच्या सीएसआर फंडामधून सदर भागातील शाळा दत्तक घेणे, शाळेत मुलांना विनामूल्य शिक्षण मिळणे इत्यादी उपक्रम घेणे गरजेचे आहे. कंपनीच्या सीएसआर फंड बऱ्याच वेळा फक्त दाखवल्या जातो परंतु त्याचा वापर केला जात नाही. तसेच या

फंडाचा वापर फक्त ग्रामीण भागासाठी न करता पूर्ण पैठण तालुक्यासाठी करण्याबाबत त्यांनी सुचवले.

५. **अण्णा लबडे पाटील शिवसेना तालुकाप्रमुख पैठण-** सदर प्रकल्प धान्य आधारित मद्य निर्मिती प्रकल्प असल्याने त्यामध्ये रसायनांचा कमीत कमी वापर केला जाणार आहे. उद्योगाने सादर केलेले सादरीकरण खूप चांगल्या पद्धतीने केलेले असून प्रकल्प प्रवर्तकाने स्थानिक भूमिपुत्रांना प्राधान्य दिल्यास त्या भागाचा खूप चांगला विकास होऊ शकतो. पंचायत समिती सदस्य प्रियांका ताई यांनी उपस्थित केलेला सीएसआर फंडाचा वापर त्याच भागात होणे गरजेचे आहे. प्रकल्पाने प्रस्तावित केलेली प्रदूषण नियंत्रण यंत्रणा उभारणी केल्यास औद्योगिक वसाहती सभोवतालच्या ग्रामीण भागात प्रदूषणाचा त्रास होणार नाही. कंपनी धान्यापासून मद्य निर्मिती करणार असल्याकारणाने कंपनीने त्या भागातील शेतकऱ्यांसोबत करार करून त्यांच्याकडून आधारभूत किमतीवर धान्य खरेदी केल्यास त्या भागातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत होईल असे त्यांनी सांगितले. उद्योग उत्पादन प्रक्रियेतून तयार होणारा कंपोस्ट खत शेतकऱ्यांना आधारभूत किमतीवर उपलब्ध करून दिल्यास त्याचा फायदा सभोवतालच्या शेतकऱ्यांना होऊन शेतकरी सुजलाम सुफलाम होण्यास मदत होईल असे त्यांनी सांगितले. सदर प्रस्तावित प्रकल्पाची जनसुनावणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून घेण्यात येत आहे परंतु सद्यस्थितीत औद्योगिक वसाहतीत कार्यरत रासायनिक उद्योगांना कोणत्या आधारे परवानगी देण्यात आली याबाबत स्पष्ट करावे असे त्यांनी सांगितले.आपला प्रकल्प खूप चांगल्या पद्धतीने दाखविलेला असून प्रकल्पामध्ये स्थानिक कामगारांना कायमस्वरूपी समावेश करून घेणे, सांडपाणी प्रदूषण व हवा प्रदूषण बाबत काळजी घेऊन प्रकल्प चालवण्यास माझी हरकत नाही असे त्यांनी सांगितले.

**कंपनी प्रतिनिधी श्री चिखले** - यांनी सांगितले की उद्योगातून निघणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रियेसाठी अद्यावत सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा, इ एस पी प्रणालीवर आधारित हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा करण्यात येईल. कंपनीच्या चिमणीची उंची ६० मीटर ठेवण्यात येणार असून त्यामुळे प्रदूषणाचा त्रास होणार नाही. कंपनीची उभारणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमावलीप्रमाणे करण्यात येणार असून त्याचे तंतोतंत पालन भविष्यात केले जाईल असे त्यांनी सांगितले. कंपनीला अल्कोहोल निर्मितीसाठी खराब धान्याची गरज असून ते खरेदी करतेवेळी स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल असे त्यांनी उपस्थितांना आश्वासित केले.

**अण्णा लबडे पाटील शिवसेना तालुकाप्रमुख पैठण-** पंचायत समिती सदस्य प्रियांका ताई यांनी उपस्थित केलेला सीएसआर फंडाबाबत त्यांनी सांगितले की पैठण औद्योगिक वसाहतीतील कंपनीच्या सीएसआर फंडाचा वापर पैठण तालुक्यात करण्यात यावा.

**कंपनी प्रतिनिधी श्री. राजेश पाटील**- त्यांनी सांगितले की मी कंपनीचा व्यवस्थापकिय प्रमुख असून माझ्या अतिपत्याखाली कंपनीचे चिकलठाणा व पैठण हे दोन युनिट आहेत. लोकांनी व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया व लोकांच्या सूचना यांचे मी स्वागत करतो.मीनाक्षी अग्रो यांनी मोरया डिस्टिलरी अधिग्रहण दोन वर्षापूर्वी केलेली असून या कालावधीत सीएसआर फंडातून साधारण वीस लाख रुपये दोन शाळेच्या डिजिटलायझेशन साठी खर्च केलेले आहेत. कंपनीच्या सीएसआर फंडाचा वापर पूर्ण

पैठण तालुक्यासाठी करण्यात येईल. प्रदूषण नियंत्रणाबाबत अद्यावत यंत्रणेचा वापर केल्यामुळे आमची कंपनी झिरो प्रदूषण युक्त असेल. अण्णासाहेब लबडे यांनी सुचविल्याप्रमाणे धान्य खरेदीमध्ये स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल असे त्यांनी सांगितले. आमच्या कंपनीचा समूह प्रचलित पर्यावरण विषयक व इतर कायद्यांची पूर्णपणे अमलबजावणी करणारा आहे याबाबत अश्वस्त करतो. सदर कंपनीमध्ये साधारण बाराशे कामगार लागणार असून स्थानिकांना त्यांच्या गुणवत्तेनुसार प्राधान्य देण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

**श्री. नांदवटे उपप्रादेशिक अधिकारी-** श्री. अण्णा लबडे यांनी उपस्थित केलेल्या रासायनिक उद्योगांच्या जन सुनावणी घेण्याबाबत त्यांनी सांगितले की पर्यावरण विषयक जन सुनावणी पर्यावरण आघात मूल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदीनुसार घेतली जात असून सन २००६ पूर्वी अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीतील खालील उद्योग वगळून जन सुनावणी पासून सूट देण्यात आलेली आहे. ज्या उद्योगांची जन सुनावणी घेणे अपेक्षित आहे त्यांची सूची खालील प्रमाणे आहे. त्यामध्ये प्रामुख्याने थर्मल पावर प्लांट, न्यूक्लियर पावर प्लांट, डिस्टिलरी व साखर कारखाने यांचा समावेश आहे. मीनाक्षी अग्रो यांचा प्रस्तावित डिस्टिलरी प्रकल्प असल्यामुळे त्यांची जन सुनावणी घेण्यात येत आहे असे त्यांनी सांगितले. एमआयडीसी कार्यक्षेत्रात औषधी उत्पादन करणाऱ्या बल्क ड्रग, इंटरमीडिएट इत्यादी उद्योगांना जन सुनावणी घेण्याबाबत दि. २७/०४/ २०१८ च्या परिपत्रकानुसार सूट देण्यात आलेली आहे.

**श्री अण्णा लबडे शिवसेनाप्रमुख पैठण**- पैठण औद्योगिक वसाहतीत रासायनिक कंपन्या ड्रग्स उत्पादन करत असून त्याबाबत गुजरात पोलीस पथक कार्यवाही करते. परंतु स्थानिक प्रदूषण नियंत्रण मंडळास याबाबत काहीच माहिती नसते. प्रदूषण नियंत्रण मंडळ उद्योगांना परवानगी देतेवेळी कंपनीचे उत्पादन व त्याबाबत माहिती घेत नाही का असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. त्याबाबत त्यांनी उपजिल्हाधिकारी महोदयांना कंपनी नेमकी काय उत्पादन घेते याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून अहवाल मागवावा व आपण जातीने लक्ष द्यावे अशी विनंती केली.

**श्री नांदवटे उपप्रादेशिक अधिकारी-** पैठण औद्योगिक वसाहती दोन वर्षांपूर्वी ड्रग्सचे उत्पादन घेत असलेल्या घटनेबाबत नॉर्कोटिक्स डिपार्टमेंट कार्यवाही करत आहे. सदर बाब महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे निगडित नसून औद्योगिक प्रक्रियेतून निर्माण होणारे सांडपाणी, त्याची प्रक्रिया यंत्रणा, निर्माण होणाऱ्या हवा प्रदूषके व त्याची प्रक्रिया यंत्रणा इत्यादी बाबी प्रदूषण नियंत्रण मंडळाशी संलग्न आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगांना ठराविक उत्पादनासाठी परवानगी दिली जाते परंतु त्या उत्पादनाचे पृथक्करण करण्याची यंत्रणा आमच्याकडे उपलब्ध नाही. आमच्या प्रयोग शाळेत फक्त सांडपाणी हवा प्रदूषके तपासणी यंत्रणा अस्तित्वात आहे. उद्योगाच्या उत्पादन प्रक्रियेत झालेला आपघात व इतर बाबी या डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रियल हेल्थ अँड सेफ्टी यांच्याकडून तपासले जातात. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून फक्त सांडपाणी व हवा प्रदूषके याबाबत तपासणी केली जाते असे त्यांनी सांगितले.

६. **श्री.विष्णू बोडके-**

पर्यावरण विषयक जन सुनावणीची माहिती स्थानिक रहिवाशींना देण्यात आली नाही.

**श्री. नांदवटे उपप्रादेशिक अधिकारी-** पर्यावरण आघात मूल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे पर्यावरण विषयक जन सुनावणीची सूचना सकाळ व टाइम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात जन सुनावणीच्या ३० दिवस पूर्वी प्रकाशित करण्यात आली. पर्यावरण आघात मूल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रकल्पाचा पर्यावरण आघात अहवाल प्रकल्पाची कार्यकारी सारांशाची टिप्पणी छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील ११ कार्यालयामध्ये संबंधितांच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आली होती. वृत्तपत्रात प्रकाशित केलेल्या जन सुनावणीच्या सूचनेमध्ये प्रकल्प बाधित् व प्रकल्पाच्या संबंधित व्यक्तीने प्रकल्पाच्या पर्यावरण आघात व इतर दस्ताचा अभ्यास करून सदर प्रकल्पाबद्दल त्यांचे मत विचार हरकती व सूचना सुनावणीची सूचना सुनावणीच्या दिनांक पर्यंत लेखी व सुनावणी दरम्यान प्रत्यक्षात मांडता येऊ शकतील असे प्रकाशित केले होते.

**विष्णू बोडके-** ग्रामीण भागात सकाळ पेपर वाचणारे खूप कमी लोक असल्यामुळे त्यांना याबाबत माहिती मिळाली नाही. परंतु त्यांना उशिराने माहिती मिळाल्यामुळे औद्योगिक वसाहती लगतच्या चार गावातील स्थानिक रहिवासी उपस्थित आहेत त्यामुळे भविष्यात पैठण औद्योगिक वसाहतीतील उद्योगांची सुनावणी घेतेवेळी कंपनी संदर्भातील दस्तावेज औद्योगिक वसाहती लगतच्या चार गावांच्या ग्रामपंचायत मध्ये ठेवण्याची व्यवस्था करावी.

**श्री. नांदवटे उपप्रादेशिक अधिकारी-** औद्योगिक वसाहती लगतच्या गावातील रहिवाशींचे सुनावणी दरम्यान सादर केलेल्या निवेदन व त्यांना काही लेखी निवेदन द्यावयाचे असल्यास त्यांना आज संध्याकाळपर्यंत देण्यास सांगण्यात यावे. आपण सुनावणी दरम्यान व्यक्त केलेले मत व आपले विचार यांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केलेले असून आपण सादर केलेल्या निवेदनाचा इतिवृत्तात उल्लेख करून सक्षम प्राधिकरणास पाठवण्यात येईल. आपण व्यक्त केलेले पर्यावरण विषयक मत व सूचना यांचा विचार उद्योगाला पर्यावरण विषयक अनुमती देतेवेळी केला जाईल असे त्यांनी स्पष्ट केले.

७. **सुरेश मडके जिल्हाध्यक्ष माजी सैनिक संघटना छत्रपती संभाजी नगर -** पैठण औद्योगिक क्षेत्रासाठी झालेल्या भूसंपादनापैकी ७० टक्के जमीन मुद्दल वाडी या गावाची असून स्थानिक ग्रामस्थांना फक्त ३० टक्के जमीन शिल्लक असून त्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो. ग्रामस्थांनी उद्योगांसाठी जमिनी दिल्यानंतर भूमिपुत्रांना सदर उद्योगांमध्ये त्यांच्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे प्राधान्य देणे गरजेचे होते परंतु सद्यस्थितीत काम करणारा बहुतांश कामगार वर्ग कंत्राटी स्वरूपाचा असून स्थानिक भूमिपुत्रांच्या प्रमाण कमी असल्याचे त्यांनी सांगितले. औद्योगिक वसाहत पैठण स्थित बऱ्याच उद्योगांकडून हवा प्रदूषण व जलप्रदूषण होत असल्याकारणाने संबंधित अधिकाऱ्यांनी त्याकडे लक्ष द्यावे अशी मी त्यांना विनंती करतो. आपला प्रकल्प खूप चांगल्या पद्धतीने दाखविलेला असून प्रकल्पामध्ये खराब धान्य वापरले जाणार असून रसायनांचा कमीत कमी वापर केला जाणार आहे. प्रकल्प प्रवर्तकाने स्थानिक कामगारांना कायमस्वरूपी समावेश करून घेणे, सांडपाणी प्रदूषण व हवा प्रदूषण यंत्रणा चालविणे इत्यादी काळजी घेतल्यास माझी हरकत नाही असे त्यांनी सांगितले.

८. **रामेश्वर बोबडे राहणार वाहेगाव-** आपला प्रकल्प खूप चांगल्या पद्धतीने दाखविलेला असून प्रकल्पामध्ये खराब धान्य वापरले जाणार असून रसायनांचा कमीत कमी वापर केला जाणार आहे.

प्रकल्प प्रवर्तकाने स्थानिक कामगारांना कायमस्वरूपी समावेश करून घेणे, सांडपाणी प्रदूषण व हवा प्रदूषण यंत्रणा चालविणे इत्यादी काळजी घेतल्यास माझी हरकत नाही असे त्यांनी सांगितले.

९. **सुरेश शिंदे ग्रामपंचायत सदस्य माजी उपसरपंच मुदलवाडी-** आपला प्रकल्प खूप चांगल्या पद्धतीने दाखविलेला असून सादरीकरणात दाखविले त्याप्रमाणे प्रत्यक्षात उतरविणे गरजेचे आहे. पैठण औद्योगिक वसाहतीत सांडपाणी प्रदूषण हवा प्रदूषण व इतर समस्या भरपूर असल्यामुळे लोकांचे जनजीवन मुश्किलीचे झालेले आहे. त्यामुळे प्रकल्प प्रवर्तकाने स्थानिक कामगारांना कायमस्वरूपी समावेश करून घेणे, सांडपाणी प्रदूषण व हवा प्रदूषण यंत्रणा चालविणे इत्यादी काळजी घेतल्यास माझी हरकत नाही असे त्यांनी सांगितले.

१०. **एक रहिवासी** - प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की आणि कंपन्यांची सुनावणी २००६ नंतर घेतली जात आहे परंतु सद्यस्थितीत पैठण औद्योगिक वसाहतीत सांडपाणी प्रदूषण वायू प्रदूषण खूप जास्त पसरलेले आहे. त्याबाबत माननीय जिल्हाधिकारी महोदयांनी लक्ष देणे गरजेचे आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी त्यावर नियंत्रण ठेवणे गरजेचे असून त्याच नाव देवी वसातील प्रदूषण कमी करण्यावर भर द्यावा असे त्यांनी सांगितले. काही उद्योगाने एमआयडीसी परिसरात बोरवेल घेतलेले असून त्या बोरवेल मध्ये सांडपाणी रिव्हर्स बोरिंगनी सोडले जाते. त्याबाबत एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी दाखल केल्यानंतर त्यावर कार्यवाही केली जात नाही असेही त्यांनी सांगितले. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी, पैठण औद्योगिक वसाहती शेजारील गावांचे प्रतिनिधी व आमदार विलास बापू भुमरे यांची संयुक्तिक बैठक घेणे गरजेचे आहे असे त्यांनी सांगितले.

११. **श्री आशिष लबडे ग्रामपंचायत सदस्य मुदलवाडी**- आपला प्रकल्प खूप चांगल्या पद्धतीने दाखविलेला असून प्रकल्पामध्ये खराब धान्य वापरले जाणार रसायनांचा कमीत कमी वापर केला जाणार आहे. प्रकल्प प्रवर्तकाने स्थानिक कामगारांना कायमस्वरूपी समावेश करून घेणे, शेतकऱ्यांकडून धान्य खरेदी करणे , परिसरातील सुशिक्षित मुलांना कायमस्वरूपी नोकरी देणे प्रत्येक कामगाराचा विमा असणे ,सांडपाणी प्रदूषण व हवा प्रदूषण यंत्रणा चालविणे इत्यादी काळजी घेतल्यास माझी हरकत नाही असे त्यांनी सांगितले.

१२. **श्री. मनीष होळकर, सदस्य, सार्वजनिक सुनावणी समिती:** १. बहु-प्रभावी बाष्पीभवकामधून (Multiple Effect Evaporator) दररोज किती प्रमाणात कंडेन्सेट (Condensate) निर्माण होईल? २. आंबवण (fermentation) प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या ३६,००० मेट्रिक टन (MTA) कार्बन डायऑक्साइडच्या वापराचे तुमचे नियोजन काय आहे? ३. अहवालात असा उल्लेख आहे की तुम्ही आंबवण प्रक्रियेसाठी अत्यंत विशिष्ट पेशींचा (highly specialized cell) वापर करणार आहात. या पेशी जनुकीयदृष्ट्या सुधारित / रूपांतरित (Genetically Engineered / Modified) आहेत का? तसे असल्यास, तुम्ही 'जेनेटिक इंजिनिअरिंग अप्रेझल कमिटी'कडून (GEAC) नाहरकत प्रमाणपत्र (NOC) प्राप्त केले आहे का?

१३. **श्री राऊत , मसीहा संस्थेचे प्रतिनिधी**- माझा एमआयडीसी वाळूज आणि चिकलठाणा येथे उद्योग मागील ३५ वर्षापासून कार्यरत असून सन २०१२ साली वाळूज औद्योगिक वसाहतीतील प्रदूषणामुळे बरेच उद्योग बंद करण्याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून आदेश पारित केले गेले. त्यादरम्यान उद्योजकांचे एक शिष्ट मंडळ युरोप येथे दौऱ्यावर गेले असता तेथील वृक्ष लागवड व निसर्ग सौंदर्य पाहून आम्ही एमआयडीसी वाळूज परिसरात वृक्ष लागवड करण्याचा निर्णय घेतला. आम्ही मोरे चौकापासून गुड इयर रोडच्या दोन्ही बाजूला एक करोड वृक्षांची लागवड केली असून त्यामुळे सभोवतालच्या परिसरातील प्रदूषणाचा त्रास पूर्णपणे कमी झाला. पैठण औद्योगिक वसाहती सभावतालच्या ग्रामस्थांना मी सांगू इच्छितो की आपण उद्योजकांची तक्रार करण्याऐवजी आपण पर्यावरणामध्ये काय कॉन्ट्रीब्यूट करू शकतो काय भर घालू शकतो यावर आपण लक्ष देणे गरजेचे आहे. उद्योजकांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून भूखंड प्राप्त केल्यानंतर स्थानिक भूमिपुत्रांना रोजगार देणे गरजेचे आहे. मी स्वतः उद्योजक असून मागील ३५ वर्षापासून कंपनी चालवत असल्यामुळे मला उद्योजकांच्या समस्या, प्रदूषणाच्या समस्या व लोकांची मानसिकता याची पूर्ण कल्पना आहे. मी उद्योग चालवण्या व्यतिरिक्त मी स्वयंसेवी संस्था चालवत असून नाथषष्ठी या पैठण येथील दरवर्षी होणाऱ्या उत्सवात मागील पंधरा वर्षापासून लोकांना वैद्यकीय सेवा सुविधा विनाशुल्क पुरवण्याचे काम माजी स्वयंसेवी संस्था करत आहे. त्यामुळे मी सर्वसामान्य नागरिकांना व रहिवाशांना आवाहन करतो की पर्यावरणाच्या रक्षणासाठी आपण पैठण औद्योगिक वसाहतीत वृक्ष लागवड भरपूर प्रमाणात करा जेणेकरून प्रदूषणाचा त्रास व होणारा परिणाम कमी होईल. पैठण औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योगांची वाढ झाल्यानंतर जवळपासच्या परिसराचा विकास होण्यास मदत होईल असे त्यांनी सांगितले.

**प्रकल्प प्रवर्तक**- मीनाक्षी अग्रो डिस्टिलरी हा प्रकल्प धान्य आधारित असवणी प्रकल्प असून उत्पादन प्रक्रियेतून तयार झालेला कार्बन डाय-ऑक्साइड एकत्रित करून तो बॉटलिंग उद्योगास व ब्रेवरीज उद्योगास विकण्यात येईल. उत्पादन प्रक्रियेतून तयार झालेल्या सांडपाण्यांपैकी ७० टक्के पाण्याचा पुनर्वापर केला जाणारा असून उर्वरित ३० टक्के पाण्याचा वापर उद्योगाच्या परिसरात बागकामासाठी केला जाईल. सदर प्रकल्प शून्य निकसन औद्योगिक सांडपाणी या तत्त्वावर आधारित असून उद्योगाच्या उत्पादन प्रक्रियेतून निघणाऱ्या सांडपाण्याचा पूर्णपणे पुनर्वापर केला जाईल. त्यामुळे सांडपाणी प्रदूषणामुळे सभोवतालच्या परिसरात कुठल्याही पद्धतीचा धोका निर्माण होणार नाही. सदर उद्योग सर्व कायदेशीर बाबीची पूर्तता करणारा असून कुठल्याही नियमांचे उल्लंघन या उद्योगाकडून होणार नाही याबाबत मी आपणास अस्वस्थ करतो असे त्यांनी सांगितले. कंपनीच्या उत्पादन प्रक्रियेत वापरले जाणारे ईस्टचा प्रकार कोणता आहे व जर बाहेरून देशात आयात केले जाणारे असेल तर त्याबाबत जेनेटिक इम्पोर्टची परमिशन घेतली आहे काय याबाबतची माहिती आपणास लेखी स्वरूपात कळविण्यात येईल असे त्यांनी श्री होळकर जन सुनावणी समिती सदस्य यांच्या प्रश्नाचे उत्तर दिले.

१४. **भरत साहेबराव मुकुटमल पंचायत समिती सदस्य**- आपला प्रकल्प खूप चांगल्या पद्धतीने दाखविलेला असून प्रकल्पामध्ये खराब धान्य वापरले जाणार रसायनांचा कमीत कमी वापर केला

जाणार आहे. सदर कंपनी सीएसआर फंडातून समाज उपयोगी जसे शाळेचे डिजिटलयजेशन, स्थानिकांना नोकऱ्या देणे, मागील वर्षभरात भूमिपुत्रांना कंपनीचे काम देणे इत्यादी घेतलेले उपक्रम समाज उपयोगी आहेत म्हणून मी कंपनीच्या पुढील कामकाजच शुभेच्छा देतो असे म्हणून त्यांनी त्यांचे दोन शब्द संपवले.

१५. **वसंत हंगराळे एनजीओ** - उद्योगाने दाखविलेले सादरीकरण चांगल्या पद्धतीचे असून सांडपाणी व हवा प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी उद्योगाने काळजी घेणे गरजेचे आहे. उद्योगाचा सीएसआर फंड सभोवतालच्या ग्रामस्थांच्या आरोग्यविषयक समस्या, ग्रामस्थांचे स्किल डेव्हलपमेंट इत्यादी समाज उपयोगी बाबी मध्ये खर्च करणे गरजेचे आहे.

१६. **सरपंच योगेश रोडे**- मीनाक्षी अग्रो ही कंपनी खूप चांगली असून त्यांचे सादरीकरण उत्कृष्ट आहे . कंपनीने पुढाकार घेऊन सुरू केलेल्या समाज उपयोगी बाबी आणि स्थानिकांना रोजगार निर्मिती बाबत दिलेले आश्वासन यामुळे आम्ही कंपनीचे स्वागत करतो. परंतु पैठण औद्योगिक वसाहतीत बरेच लहान रासायनिक उद्योगातून ते त्यांची हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा व सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा चालवत नाहीत त्यामुळे सभोवतालच्या परिसरात ग्रामस्थांना हवा प्रदूषणाचा त्रास होत आहे. सदर बाबत उद्योगांना तक्रारी केल्यास अथवा त्यांच्याकडून सीएसआर फंडाची मागणी केल्यास त्यांच्याकडून आम्हाला सहकार्य मिळत नाही त्याबाबत आम्ही प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार केल्यानंतर त्यांच्याकडून योग्य ती कार्यवाही वेळेत केली जात नाही असे त्यांनी सांगितले. सदरबाबत माननीय जिल्हाधिकारी महोदयांनी जातीने लक्ष घालून संबंधितांना आदेश द्यावे ही विनंती.

१७. **अंबादास गायके शेतकरी**- मीनाक्षी अग्रो ही कंपनी खूप चांगली असून त्यांचे सादरीकरण उत्कृष्ट आहे . कंपनीने पुढाकार घेऊन सुरू केलेल्या समाज उपयोगी बाबी आणि स्थानिकांना रोजगार निर्मिती बाबत दिलेले आश्वासन यामुळे आम्ही कंपनीचे स्वागत करतो. कंपनीला लागणारा कच्चा माल स्थानिकांकडून खरेदी करावा अशी मी त्यांना विनंती करतो.

१८. **सोमनाथ आसाराम बोडके**- मीनाक्षी अग्रो ही कंपनी खूप चांगली असून त्यांचे सादरीकरण उत्कृष्ट आहे. कंपनीने पुढाकार घेऊन सुरू केलेल्या समाज उपयोगी बाबी आणि स्थानिकांना रोजगार निर्मिती बाबत दिलेले आश्वासन यामुळे आम्ही कंपनीचे स्वागत करतो. कंपनीने सदर परिसरातील भौगोलिक स्थिती व इतर बाबींचे सादरीकरण दाखवले परंतु परिसरातील प्रदूषणाबाबत त्यांनी सांगितले नाही. मोबाईल रंगाने नियमितपणे तपासणी केली जाते परंतु त्याबाबत दिले जात नाही. प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून औद्योगिक वसाहतीतील सांडपाण्याचे नमुने संकलित केले जातात परंतु उद्योगाविरुद्ध कार्यवाही केली जात नाही असे त्यांनी सांगितले.

**श्री नांदवटे उपप्रादेशिक अधिकारी**- पैठण औद्योगिक वसाहतीतील पाणी प्रदूषण व शेत पिकाचे नुकसान याबाबत माननीय राष्ट्रीय हरित लवादात याचिका क्रमांक २२२/२०२३ मंगल विष्णू बोडके विरुद्ध मॅट्रिक्स लाइफ सायन्स व इतर ही याचिका प्रलंबित असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. माननीय राष्ट्रीय हरित लवाद यांनी सदर प्रकरणी आयसीटी मुंबई या तज्ञ संस्थेची नेमणूक केलेली असून पैठण औद्योगिक वसाहतीतील उद्योगांचे सर्वेक्षण, सांडपाणी गुणवत्ता तपासणे, शेत पिकाचे झालेले नुकसान व भूगर्भातील पाण्याची गुणवत्ता पूर्ववत करण्याबाबत आयसीटी संस्थेचा अभ्यास

गट नियुक्त केला असून त्यांनी केलेल्या शिफारशी व माननीय राष्ट्रीय हरित लवाद यांच्या आदेशानुसार काम करण्यात येत आहे. सदर कामी आयसीटी मुंबई या संस्थेचा अहवाल पुढील सहा महिन्यात अपेक्षित असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याकारणाने त्याबाबत जास्तीचे बोलणे उचित नसल्याचे उपप्रादेशिक अधिकारी श्री नांदवटे यांनी सांगितले.

**माननीय अध्यक्ष जनसुनावणी समिती-** माननीय राष्ट्रीय हरित लवादात याचिका क्रमांक २२२/२०२३ मंगल विष्णू बोडके विरुद्ध मॅट्रिक्स लाइफ सायन्स व इतर ही याचिका प्रलंबित असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. पैठण औद्योगिक वसाहतीतील पाणी प्रदूषण व शेत पिकाचे नुकसान झाल्याची बाब मला अवगत असून मी स्वत: त्या समितीमध्ये काम केलेले आहे. जमिनीतील पाण्याचा रंग पिवळा झालेला असून हे पाणी पिण्यास योग्य नसल्याबाबतचा अहवाल आमच्या समितीने राष्ट्रीय हरित लवादास दिलेला आहे. राष्ट्रीय हरित लवादाकडून आयसीटी या संस्थेची सदर कामी नेमणूक करण्यात आलेली असून उद्योगांचे तांत्रिक ऑडिट, शेतकऱ्यांची नुकसान भरपाई इत्यादी बाबत त्यांच्याकडून अहवाल पुढील सहा महिन्यात सादर करणे अपेक्षित आहे. आयसीटी संस्थेकडून प्राप्त झालेल्या अहवालानंतर माननीय राष्ट्रीय हरित लवाद यांच्याकडून दिलेल्या आदेशानुसार पैठण औद्योगिक वसाहतीतील प्रदूषण व त्याबाबतचे निर्णय घेतले जातील असे त्यांनी सांगितले. आजची सुनावणी मीनाक्षी अग्रो या कंपनीची असून त्या उद्योगाच्या पर्यावरण विषयक बाबी व इतर बाबत आपण आपली सूचना अथवा विचार व्यक्त करू शकता. त्यामुळे आपण इतर बाबत चर्चा करणे योग्य नाही असे माननीय अध्यक्ष यांनी उपस्थित त्यांना सांगितले.

१९. **सोमनाथ आसाराम बोडके-** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नियमितपणे हवेची तपासणी केली जाते व प्रदूषणाची मात्रा काय आढळते याबाबत एमपीसीबीने आम्हाला सांगावे

**श्री नांदवटे उपप्रादेशिक अधिकारी-** प्रदूषणाची तपासणी वेगवेगळ्या घटकांसाठी केली जात असून त्याची मानके पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून तपासणी केलेल्या अहवालाची प्रत आपणास उपलब्ध करून देण्यात येईल. आपले मीनाक्षी ॲग्रो या कंपनीच्या पर्यावरण विषयक बाबी बद्दल काही मत असल्यास ते व्यक्त करावे असे त्यांनी सांगितले. परंतु उपस्थित जनसमुदायाने सदर प्रकल्पास आमचा विरोध नाही असे सांगितले. जनसमुदायाने पैठण औद्योगिक वसाहतीतील प्रदूषणाबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने स्थानिक चार गावच्या लोकांना विश्वासात घेऊन प्रदूषण कमी करण्याबाबत लक्ष द्यावे असे स्थानिक ग्रामस्थ सोमनाथ बोडके यांनी सांगितले.

श्री नांदवटे यांनी सुनावणीच्या दिवसापर्यंत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे ई-मेलद्वारे रंगराव कोठाकोंडा यांच्या “SAVE EARTH”, आर वेंकटेश यांच्या वर्षा एनवोर्मेंटल अँड रुरल डेव्हलपमेंट सोसायटी संस्थेकडून आणि व्ही सुनंदा रेड्डी लेखी तीन निवेदने त्यांच्याकडे प्राप्त झालेले होते व त्यांचे वाचन करून दाखविले.

**माननीय अध्यक्ष जनसुनावणी समिती-** माननीय राष्ट्रीय हरित लवादात याचिका क्रमांक २२२/२०२३ मंगल विष्णू बोडके विरुद्ध मॅट्रिक्स लाइफ सायन्स व इतर ही याचिका प्रलंबित असून

सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.राष्ट्रीय हरित लवादाकडून आयसीटी या संस्थेची सदर कामी नेमणूक करण्यात आलेली असून उद्योगांचे तांत्रिक ऑडिट, शेतकऱ्यांची नुकसान भरपाई इत्यादी बाबत त्यांच्याकडून अहवाल पुढील सहा महिन्यात सादर करणे अपेक्षित आहे. आयसीटी संस्थेकडून प्राप्त झालेल्या अहवालानंतर माननीय राष्ट्रीय हरित लवाद यांच्याकडून दिलेल्या आदेशानुसार पैठण औद्योगिक वसाहतीतील प्रदूषण व त्याबाबतचे निर्णय घेतले जातील असे त्यांनी सांगितले. उपरोक्त बाबी व्यतिरिक्त आपल्या काही तक्रारी असल्यास आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयात तक्रार अर्ज प्राप्त करू शकता असे त्यांनी सांगितले. मीनाक्षी अग्रो या कंपनीची जन सुनावणी आज पार पडली असून त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केलेले आहे. आपण व्यक्त केलेल्या मत मांडलेले सर्व मुद्दे याचा इतिवृत्तात समावेश करून ते सक्षम प्राधिकरणास पाठविण्यात येईल. जन सुनावणी समितीची अध्यक्ष या नात्याने आज जन सुनावणी संपली असे मी जाहीर करते असे त्यांनी सांगितले. सदर सुनावणीच्या दिवशी सुनावणी संपन्न झाल्यानंतर स्थानिक ग्रामस्थ श्री नितीन सुभाष जाधव राहणार मुदलवाडी; श्री पांडुरंग मारुती जाधव राहणार मुदलवाडी; श्री. भगवान पंढरीनाथ जाधव राहणार मुदलवाडी आणि श्रीकांत देशपांडे छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून प्रस्तावित प्रकल्पाबाबत निवेदन प्राप्त झाले असून त्याच्या प्रती सोबत जोडल्या आहेत.

(श्री.अच्युत नांदवटे)
समन्वयक जन सुनावणी समिती तथा
उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ,
छत्रपती संभाजी नगर

होळकर
(श्री. मनिष होळकर)
सदस्य जन सुनावणी समिती तथा
प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ,
छत्रपती संभाजी नगर

(श्रीमती. निलम बाफना)
अध्यक्ष जन सुनावणी समिती तथा
उप-विभागीय अधिकारी,
उपविभागीय कार्यालय पैठण